# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे नवीन पोलीस स्टेशन मंजूर करण्याबाबत

**(१) ५४३१ (०६-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे सहा वर्षापुर्वी नवीन पोलीस स्टेशन मंजूर करण्यात आले असून सदर पोलीस स्टेशनचे कामकाज प्रशासकीय भवनातील एका रुम मध्ये सुरु आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने आणि वाढते कामकाज, तसेच अधिकारी कर्मचारी यांना बसण्यास होत असलेली अपुरी व्यवस्था या कारणामूळे सदर खोली अपुरी पडत असल्यामूळे नागरिकांनी वारंवार सावली येथे पोलीस स्टेशनची नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन देण्याची मागणी केलेली आहे. तसेच त्या मागणीच्या अनुषंगाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०१४ च्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कपात सुचनेद्वारा शासनाकडे मागणी केली असून अद्यापही या कामांना मंजूरी प्राप्त झालेले नसल्याचे दिनांक २० जानेवारी २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी एकूण रुपये १,०२,०८,००० इतका निधी वितरीत करण्यात आला असून पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील देवनार पोलिस ठाणे इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(२) ५७३९ (०७-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार पोलिस ठाण्याच्या इमारतीची अत्यंत दयनीय स्थिती झाली असून छताचे प्लास्टर सतत कोसळत असल्याने पोलिसांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस ठाण्याच्या दुरुस्तीकडे वांरवार तक्रार करुनही दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१), (२) व (३) देवनार पोलीस ठाण्याची इमारत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पशुवधगृहाच्या परिसरात असून, सदर इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी बृहन्मुबई महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पालिसांनी उभारलेल्या बीट चौकी बंद असल्याबाबत

**(३) ७५९४ (०७-०४-२०१५). श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांच्या प्रत्येक विभागात बीट चौकी ऊभारण्यात आलेली आहे, परंतु त्यांची निगा न राखल्यामुळे व सतत दुर्लक्ष केल्यामुळे ब-याच विभागातील बीट चौकी बंद पडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीट चौकी नसलेल्या विभागांमध्ये चो-या तसेच इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास बीट चौकीची व्यवस्था पूर्ववत करण्यात येईल काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

---

**दोडमार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथे पोलिसांसाठी निवास व्यवस्था करण्याबाबत**

**(४) ८००५ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडमार्ग( जि.सिंधुदुर्ग) तालुक्यासाठी स्वतंत्र पोलिस ठाण्याचा दर्जा पाच वर्षापूर्वीच प्राप्त झाला परंतु पोलिस वसाहतीचा प्रश्न जागेअभावी अद्यापी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिस अधिकारी व कर्मचारी खाजगी जागेत भाड्याने राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसाहतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग पोलस ठाण्यातील पोलीस अधिकारी/कर्मचा-यांन निवास व्यवस्थेसाठी शासकीय जागा उपलबध करुन घेण्यासाठी पाठपुरावा करणेत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील पोलीस वसाहतीची इमारत कालबाह्य झाल्याबाबत**

**(५) ११९७४ (०६-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील पोलीस वसाहतीची इमारत कालबाह्य झाली असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे ही इमारत केव्हाही कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आल आहे काय,

(३) असल्यास,चौकशी काय आढळून आले व पोलीस वसाहतीची नवीन अद्यावत इमारत बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) श्रीगोंदा येथील पोलीस निवास्थानामधील २ अधिकारी निवासस्थाने व १ कर्मचारी निवासस्थन नादुरुस्त असल्याने सर्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील पोलीस वसाहतींची देखभाली अभावी दुर्दशा झाल्याबाबत

**(६) १२४४३ (०७-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पोलीस वसाहतींची देखभाली अभावी दुर्दशा झालेली असून सदर वसाहतींच्या देखभालीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असूनही निधी अभावी देखभालीचे काम करणेत येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१) व (२) पेलीस वसाहतीतील इमारतीची नियमित देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येते. विशेष दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक तयार करुन सक्षम मान्यतेसाठी पाठविण्यात येते व मान्यतेनंतर दुरुस्तीची प्रक्रिया करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील पोलीस कर्मचा-यांची निवासस्थाने रहाण्यायोग्य नसल्याबाबत

**(७) १३३०० (०७-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील पोलीस कर्मचा-यांची निवासस्थाने रहाण्यायोग्य नसल्याची बाब दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१५) :** (१) एकूण ९२५ पैकी २८० राहण्यास अयोग्य आहेत.

(२) पोलीस कर्मचा-यांच्या निवास्थानांची दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील मेहेदंळे गावाने गेल्या १८ वर्षात महापालिकेचे सुमारे १ कोटी १० लाख रुपयांचे पाण्याचे बील थकविले असल्याबाबत

**(८) १६४५८ (११-१०-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील मेहेदंळे गावाने गेल्या १८ वर्षात महापालिकेचे सुमारे १ कोटी १० लाख रुपयांचे पाण्याचे बील थकविले असल्याने या गावाचा पाणीपुरवठा बंद केला असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्यासारख्या अत्यावश्यक गोष्टींचा पूर्ववत पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासन या थकबाकीत सुट देण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

मेहेंदळे ग्रामपंचायतीकडे धुळे महानगरपालिकेची पाणी बीलाची मागील १८ वर्षापासूनची थकबाकी रक्कम रु. १ कोटी आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने व ही वसूली होणे आवश्यक असल्याने दि. १४.५.२०१५ रोजी सदर पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता.

(२) संबंधित ग्रामपंचायतीने थकीत रक्कम टप्प्याटप्प्याने भरण्याचे आश्वासित करुन, रु. ५००००/- थकबाकी पोटी जमा केल्यानंतर सदर पाणीपुरवठा मे २०१५ मध्ये पुर्ववत सुरु करण्यात आला आहे. थकबाकीमध्ये महानगरपालिकेने कोणतीही सुट दिलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यात सोशल क्रिडाक्लबच्या नावाने अवैध धंदे सुरु असल्याबाबत

**(९) १६५१४ (१२-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अनेक ठिकाणी सोशल क्रिडाक्लबच्या नावाने पत्त्याचे क्लब, जुगाराचे अड्डे चालु असून अवैध सावकारी, अवैध दारु विक्री, या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची अलाढाल होत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निवेदन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) जिल्ह्यात एकूण ४७ सोशल क्लब धर्मदाय आयुक्तांनी नोंदणी केलेले असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अवैध, जुगार अवैध सावकारी, दारु विक्री केल्याचे आढळून आले नाही. चालु वर्षी पोलीसांची नजर चुकवून अवैध क्लब चालविणाऱ्या २ सोशल क्लब व ५ अवैध जुगार अड्डयांवर कारवाई करण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

### नागपूर येथील सेंट्रल जेलमध्ये मोबाईल व सिमकार्ड जप्त केल्याबाबत

**(१०) १७०४९ (१२-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या सेंट्रल जेलमध्ये सुरु असलेल्या झाडाझडतीत सात दिवसात ५१ मोबाईल आणि काही सिमकार्ड जप्त करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात सखोल चौकशी करुन संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) दिनांक ३१.०३.२०१५ रोजी पाच बंदी पललायनानंतर कारागृहात विविध पथकामार्फत झडत्या घेण्यात आल्या असून त्यामध्ये मोबाईल चार्जर, बॅटरी, सिमकार्ड व अंमलीपदार्थ आढळून आलेले आहेत.

बंदी पलायन प्रकरणी या कारागृहाचे १ अधिक्षक, २ वरिष्ठ तुरुंगाधिकारी, २ तुरुंगाधिकारी श्रेणी-२, २ हवालदार, ३ रक्षक यांना निलंबित करण्यात आले असून मोबाईल प्रकरणात श्री.श्रीकृष्ण देवराव राहाटे, रक्षक यास बडतर्फ करण्यात आलेले आहे.

तसेच इतर १८ संशयीत कर्मचाऱ्यांना या कारागृहात इतर कारागृहात संलग्न करण्यात आलेले आहे. व त्यांची विभागाबाहेर बदली करणेबाबतचा प्रस्ताव कारागृह महानिरिक्षक यांचे कार्यालयास सादर करण्यात आलेला असून त्यापैकी तीन कर्मचाऱ्यांची विभागाबाहेर बदली करण्यात आलेली आहे.

तसेच झडतीत आढळून आलेल्या मोबाईल प्रकरणी २ तूरुंगाधिकारी श्रेणी-२ यांची विभागीय चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपूर यांना सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड शहरातील अंतर्गत सिमेंट रस्ते ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आल्याबाबत

**(११) १७०९८ (११-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील अंतर्गत सिमेंट रस्ते ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आले असून हे रस्ते ठराविक मुदतीत पुर्ण न झाल्यास पावसाळ्यात अनेक भागातील रस्ते बंद होणार असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहरातील तरोडा खु व बु. भागातील ड्रेनेज लाईनचे कामे मागील दोन महिन्यापासून धिम्या गतीने सुरु असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत हे पाहता वरील कामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) तरोडा (खु) व (बु.) भागातील ड्रेनेज लाईनचे कामाची देयके निधी अभावी प्रदान करण्यात आलेली नसल्याने कंत्राटदाराची कामाची गती मंद आहे. जे रस्ते ड्रेनेजलाईनचे काम करतेवेळेस खोदण्यात आले होते त्या रस्त्याचे (Restoration) दुरुस्तीची कामे करण्यात आलेली असून त्यामुळे पावसाळ्यात कुठलेही रस्ते बंद होणार नाहीत. या योजनेची कामे गतीने करण्याबद्दल कंत्राटदारास महानगरपालिकेने आदेशीत केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील वैशालीनगर टी पाईंट ते दिलराज नगर - संतोष नगर पर्यंत जाणा-या रस्त्याचे काम करण्याबाबत**

**(१२) १७१०९ (११-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तरोडा (ब्रु), नांदेड येथील वैशालीनगर टी पाईंट ते दिलराज नगर - संतोष नगर पर्यंत जाणा-या रस्त्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले आहे परंतु मागील अनेक दिवसापासून असलेले विजेचे खांब बाजूला न काढताच ते रस्त्याच्या मधोमध ठेवून रस्त्याचे काम केले जात असल्याने हा रस्ता पुर्ण झाल्यानंतर येथे वाहनांचे मोठे अपघात होतील अशी भिती व्यक्त केली जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) सदरील रोडवर रस्त्याचे मध्ये असलेले एकूण ४ एच.टी.पोल व ४ एल.टी.पोल पैकी ३ एच.टी.पोल व ३ एल.टी.पोल रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत करुन, रहदारीस अडथळा दूर करण्यात आला आहे उर्वरीत पोल व एक एल.टी.पोल येत्या आठवड्यात महावितरण कडून परवानगी मिळाल्यानंतर रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत करण्यात येतील.
(३) सदरील कामासाठी महावितरण कंपनी, नांदेड यांच्याकडून विज खंडीत करुन काम करणेसाठी परवानगी प्रलंबित असल्याकारणाने विलंब झाला आहे. परवानगी प्राप्त होताच महानगरपालिकेकडून काम पूर्ण करण्यात येईल.

---

**नांदेड जिल्ह्यातील काबरानगर पर्यायी पाणी पुरवठा योजनेचा महापालिका प्रशासनाने पाठविलेला प्रस्तावाबाबत**

**(१३) १७११२ (२९-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील काबरानगर पर्यायी पाणी पुरवठा योजनेचा महानगरपालिका प्रशासनाने पाठविलेला प्रस्ताव राज्य शासनाने मंजूर करुन सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला असला तरी शासनाने मंजूर केलेल्या १४ कोटी ७० लाख रुपयापैकी एक रुपया देखील आजवर नांदेड मनपाला दिलेला नसल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील कित्येक वर्षापासून नांदेड शहराला विष्णुपूरी जलाशयातून पाणी पुरवठा केला जातो शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे त्यामुळे विष्णुपूरी जलाशयावर ताण येवू लागला आहे ज्या वर्षी पाऊस चांगला होत नाही त्या त्या वर्षी सिध्देश्वर व येलदरी या धरणातून पाणी घ्यावे लागते हे पाणी घेताना प्रशासनापुढे अनेकदा अडचणी निर्माण होतात हे टाळण्यासाठी नांदेड महानगरपालिकाने काबरानगर पर्यायी पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला असूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने नागरिकांची पाण्याकरिता गैरसोय होत आहे हे पाहता शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नांदेड शहराला विष्णूपरी जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येत असून येथून पाण्याची उचल केली जाते तेथे फ्लो मिटर बसविले आहेत. त्यामुळे एकूण किती पाणी उचलण्यात आले याची नोंद घेणे शक्य होते. मात्र कोटीतीर्थ व सिडकोतील पंपहाऊसचे फ्लो मिटर दोन वर्षापासून बंद आहेत. परिणामी विष्णुपूरी प्रकल्पातून उचलल्या जाण्याचे मोजमापच होत नसल्याने माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संंबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात नांदेड वाघाळा महानगरपालिकेला रु.६.४६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(२) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या काबरानगर पर्यायी पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास शासनाने दिनांक २०/०८/२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. महानगरपालिकेने दिनांक १२/०९/२०१४ कामासाठी निविदा प्रसिध्द केली व दिनांक १३/०२/२०१५ रोजी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिले आहेत सद्यस्थितीत योजनेची ९० टक्के कामे पूर्ण झाली असून नोव्हेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडा अखेर योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन केले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. परंतू कोटीतीर्थ व सिडकोतील पंप हाऊस वरुन पाणी ऊपासा केलेले मोजमाप हे तेथील वापरात असणाऱ्या विद्युत पंपाच्या डिस्चार्ज (स्त्राव) नुसार मोजमाप करण्यात येते. सदर ठिकाणी फ्लोमीटर बसविण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) फ्लोमीटरबाबत संबंधितांवर कार्यालयीन कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथे अज्ञात चोरट्यांनी तीन दुकाने फोडल्याबाबत**

**(१४) १७२४२ (१२-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथे अज्ञात चोरट्यांनी तीन दुकाने फोडून ७३ हजार रुपयांचा ऐवज पळविला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुकान फोडीच्या संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) प्रश्नात नमूद प्रकरणात ३ दुकाने फोडून रु. ७४४५०/- चा ऐवज चोरुन नेल्याबाबत वडूज पोलीस ठाणे येथे दि. १७/०३/२०१५ रोजी गु.र.नु. ३८/२०१५ भा.दं.वि. कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(३) उक्त नमूद गुन्ह्यांत २ आरोपी निष्पन्न असून त्यापैकी १ आरोपीस अटक करण्यात आली असून त्याचेकडून गुन्ह्यातींल रु ६५००/- रुपये किंमतीचे २ मोबाईल हस्तगत करण्यात आलेले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात गुन्हेगारी रोखण्यासाठी सोशल मीडिया लॅब उभारण्यात आल्याबाबत**

**(१५) १७५२८ (१२-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात गुन्हेगारी रोखणारी अत्याधुनिक पहिली सोशल मीडिया लॅब उभारण्यात आल्याचे माहे मे, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारे लॅब उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) चंद्रपूर, अकोला, नांदेड, सांगली व मुंबई शहर या ठिकाणी लॅब स्थापन झाल्या असून पुणे ग्रामीण घटकामार्फत सोशल मिडीया लॅब स्थापन करणे प्रस्तावित आहे.

तसेच अहमदनगर, भंडारा, हिंगोली, परभणी, सोलापूर (ग्रा), वाशिम, अमरावती शहर यांस आवश्यक निधी व मनुष्यबळ उपलब्ध झाल्यावर व नाशिक शहर, नागपूर शहर, सातारा, रत्नागिरी, नाशिक (ग्रा), नागपूर (ग्रा), कोल्हापूर, नंदूरबार इ. पोलीस घटकांनी भविष्यात सोशल मिडीया लॅब स्थापन करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या बोटींनी नियमापेक्षा अत्यंत कमी तास गस्त घातल्याबाबत**

**(१६) १७५३० (१२-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सागरी तट सुरक्षा योजनेतंर्गत नौकांसाठी गस्त कालावधी निश्चित केला असतांना मुंबईच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या बोटींनी नियमापेक्षा अत्यंत कमी तास गस्त घातल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या संदर्भात चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मुंबईच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या एकूण १२ बोटींनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये मुंबईच्या पूर्व व पश्चिम सागर किनारपट्टीवर एकूण ६७४१ नॉटीकल मैल दिवसरात्र सागरी गस्त केली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे आयुक्तालया अंतर्गत दिवा, कौसा तसेच कल्याण विभागातील**
**काटई येथे नविन पोलीस ठाणे सरु करण्याबाबत**

**(१७) १७९०१ (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांअंतर्गत असलेल्या मुंब्रा, दिवा  व कल्याण विभागातील काटई भागातील वाढत्या नागरिकरण व वाढत्या गुन्हयाचा विचार करता कौसा व दिवा येथे नविन पोलीस ठाणे सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी तसेच नागरीकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

कौसा व दिवा हे दोन नविन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच नागरिकांना केली आहे.

(२) व (३) नवीन दिवा पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

---

## औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहातील कैद्याचा उपचारा अभावी मृत्यु झाल्याबाबत

**(१८) १८०३८ (१२-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सुलमधील जितेंद्र कौतिक धांडे या  कैद्याची दिनांक ३ एप्रिल, २०१५ रोजी प्रकृती बिघडल्याची माहिती  मुख्य तुरुंगाधिकारी श्री. सांगळे यांना देऊनही उपाचारासाठी कारागृहातील रुग्णालयात न पाठविल्याने  मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैदी जितेंद्र धांडे आजारी असतांनाही त्याला उपचारासाठी न पाठविता तुरुंगाधिकारी यांनी त्याचा छळ केल्याने त्याचा मृत्यू झाल्याबाबत कारागृहातील कैदी सचिन रामेश्वर तायडे याने मा. मुंबई उच्च न्यायाधिश, अप्पर पोलीस महासंचालक तथा कारागृह महानिरिक्षक यांचेकडे या घटनेनंतर लेखी अर्जाद्वारे  तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने अप्पर पोलीस महासंचालक तथा कारागृह महानिरीक्षक यांनी चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) खरे नाही.

(२) हे खरे आहे. परंतु तुरुंगाधिकारी यांनी छळ केल्याने त्याचा मृत्यु झाला, ही बाब खरी नाही.

(३) अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांनी चौकशी करुन या कार्यालयास सादर केलेल्या अहवालानुसार बंदी सचिन रामेश्वर तायडे हा कारागृहाची शिस्त पाळत नाही. सारखा यार्डाच्या बाहेर फिरण्यासाठी पहाऱ्यावरील रक्षक व अधिकारी यांच्याशी हुज्जत घालतो व वादविवाद करतो आणि स्वत:चे अस्तीत्व व महत्व इतर बंद्यांना दाखविण्यासाठी नेहमी तत्पर असतो.

सदर बंद्याला कारागृहातील अधिकारी/कर्मचारी यांचेपासुन कोणताही धोका नाही.

तसेच मयत बंदी जितेंद्र धांडे यांने तो आजारी असल्याबाबत श्री. सांगळे तुरुगाधिकारी यांना तक्रार केली होती व त्यास औषधोपाचार देण्यात आले नाही ही बाब सर्वस्वी खोटी व कारागृह प्रशासनास बदनाम करण्याच्या उद्देशाने बंदी सचिन तायडे , यांने तक्रार केली आहे. सदर तक्रार अर्जातील आरोप सर्वस्वी खोटे आहे व सुडबुध्दीने केलेले आहेत. त्यामुळे सदर तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे हुपरी (जि.कोल्हापूर) येथे पोलीसानी ताब्यात घेतलेल्या २५ ते ३० मोटार सायकली गायब झाल्याबाबत**

**(१९) १८५१७ (१२-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हुपरी (जि.कोल्हापूर) येथे पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या २५ ते ३० मोटार सायकली गायब झाल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी जप्त केलेल्या सायकली त्यांच्या मालकांना परत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हुपरी पोलीस स्टेशन येथे मोटार सायकल चोरीबाबत दि. १५/०१/२०१५ रोजी गु.र.नं. ०६/२०१५ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे व दि १९/०२/२०१५ रोजी गु.र.नं. २१/२०१५ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे असे दोन गुन्हे दाखल झालेले आहेत. सदर दोनही गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) नमुद गुन्ह्यातील चोरी गेलेल्या मोटार सायकल ताब्यात घेवून मा. न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित मालकास/फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर येथे मोबाईल व्हॉटसअॅपद्वारे चॅटिंग करुन नोकरी करण्यास इच्छुक तरुणींना देहविक्री करण्यास प्रवृत्त करणा-यांना अटक केल्याबाबत**

**(२०) १८७२५ (१२-०८-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे मोबाईल व्हॉटसॲपद्वारे चॅटिंग करु नोकरी करण्यास इच्छुक तरुणींना जाळ्यात ओढल्यावर त्यांना देहविक्री करण्यास प्रवृत्त करणा-या एका तरुणीसह दोघांना अटक करण्यात आल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर घटनेतील आरोपीवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) पोलीस स्टेशन गणेशपेठ हद्दीत फिर्यादीस दोन आरोपींनी मोबाईल व्हॉटसॲपद्वारे चॅटींग करुन फिर्यादीस नोकरी लावण्याचे आमिष देवून देहविक्री करण्यास प्रवृत्त केल्याचे आढळून आल्याने आरोपीस अटक करण्यात आली असून, पोलीस स्टेशन गणेशपेठ अपराध क्र. ३४२९/२०१५ कलम ५(१)(क)(ग)(घ), ८(ख) पिटा ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे गुन्ह्यात दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असून सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विजयदुर्ग नजीक रामेश्वर खवशीवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे फ्रेंच बनावटीची बेवारस लाईफ बोट सापडल्याबाबत**

**(२१) १९४९३ (१२-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विजयदुर्ग नजीक रामेश्वर खवशीवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे फ्रेंच बनावटीची बेवारस लाईफ बोट सापडल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेवारस लाईफ बोट संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) सदर ठिकाणी सापडलेली बोट नसून एम.व्ही. ऑलिंपिक अर्जेंटीना या बार्जवरचा लाईफ राफ्ट होता.
(२) लाईफ राफ्टची चौकशी करण्यात आली असून, सदर लाईफ राफ्ट विजयदुर्ग बंदरात नांगरुन ठेवण्यात आलेल्या एम.व्ही. ऑलिंपिक अर्जेंटीना या टगचा होता. सदर टग साळगांवकर मायनींग इंडस्ट्रीज प्रा.लि. गोवा या मालकीचा असून टग मालकावर विजयदुर्ग पोलिसस्टेशन येथे बंदर निरिक्षक, विजयदुर्ग यांचेकडून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

त्याच प्रमाणे प्रादेशिक बंदर अधिकारी, वेंगुर्ला यांनी दिनांक ११ मे, २०१५ च्या पत्रान्वये त्याचा अहवाल संबंधितांना सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सत्र न्यायालयांमध्ये (जलदगती-विशेष न्यायालये) महिलांवरील अत्याचाराबाबतची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) १९६५५ (१०-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिलांवरील अत्याचाराबाबतची राज्यातील सत्र न्यायालयांमध्ये (जलदगती-विशेष न्यायालये) माहे जानेवारी, २०१५ मध्ये प्रलंबित असलेल्या ११,८२३ प्रकरणांपैकी माहे मे, २०१५ अखेर किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) उर्वरित प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) माहे जानेवारी, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत महिला अत्याचाराबाबतची सत्र न्यायालयाकडून (जलदगती-विशेष न्यायालये) १,३०१ इतकी प्रकरणे निकाली निघाली आहेत.
(२) महिला अत्याचाराची प्रकरणे विशेष न्यायालय तसेच जलदगती न्यायालया या न्यायालयांमध्ये चालविण्यात येतात.

ज्या प्रकरणामध्ये पिडीत व्यक्ती महिला आहेत अशी प्रकरणे तातडीने जलदगती न्यायालयांकडे वर्ग करावीत, अशा सूचना सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, प्रधान न्यायाधीश , नगर दिवाणी न्यायालय, मुंबई, मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांना उच्च न्यायालयाच्या दिनांक २०/०३/२०१०, ०६/०९/२०११ व ०८/१०/२०१२ च्या पत्रांन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी महिला अत्याचाराची/बलात्काराची प्रकरणे यासारख्या गंभीर स्वरुपाची प्रकरणे जास्त प्रमाणत प्रलंबित आहेत, अशी प्रकरणे प्राथम्याने चालविण्यासाठी जलदगती न्यायालयांकडे वर्ग करावीत, असे शासन निर्णय क्र.एफटीसी-२०१०/प्र.क्र.८३/नऊ, दिनांक २३ मार्च, २०११ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेत १८५ बसेस सामील होणार असल्याबाबत**

**(२३) १९९१७ (११-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून १८५ बसेस सामील होणार असल्याची माहिती दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०१ मे, २०१५ पासून ४९ बसेस चालविण्यात येणार होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बसेस चालू करण्यात आल्या आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१२) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान योजनेअंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकरीता १८५ बसेसाठी मंजूरी देण्यात आली आहे.

या बसेस टप्प्याटप्प्याने परिवहन सेवेमध्ये दाखल होत असून आतापर्यंत ७० बसेस उपक्रमात सामील झाल्या आहेत. त्यापैकी २५ बसेस सद्यस्थितीत सेवेत आणण्यात आल्या आहेत. उर्वरित बसेसबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ) नोंदणी, विमा इत्यादी प्रक्रिया पूर्ण करुन प्रवाशांच्या सोयीसाठी बसेस सेवारत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरातील महाबळजवळील चैत्रबन कॉलनीत चोरट्यांनी दोन घरे फोडली तसेच पाचोरा येथील नायब तहसिलदार यांच्या घरातून चोरट्यांनी ऐवज पळविल्याबाबत**

**(२४) १९९७० (१२-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील महाबळजवळील चैत्रबन कॉलनीत गौरी रेसिडेंन्सी या तीन मजली इमारतीत चोरट्यांनी दोन घरे फोडली तसेच पाचोरा येथील नायब तहसिलदार मिलिंद मार्तंड काळकर यांच्या घराचा कडीकोंयडा तोडून सोन्या-चांदीच्या दागिन्यासह साडेचार लाखांवर ऐवज पळविल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय, नमुद प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन जळगांव येथे दि १४/०५/२०१५ रोजी गु.र.नं. ६९/२०१५ भा.दं.वि. कलम ४५४,३८० अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) दाखल गुन्ह्यांचे अनुषंगाने पंचनामा साक्षीदार विचारपूस करण्यात आली. सदर गुन्ह्यात अज्ञात चोरट्याने रु ४,१९,५००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागीने व रोख रक्कम चोरुन नेली असल्याचे आढळून आले. सदर गुन्ह्यातील फ्लॅटचे शेजारील घरही चोरट्यांनी उघडले परंतु त्यामधुन काही चिजवस्तु चोरीस गेलेली नाही. गुन्ह्यांच्या तपास सुरु असून तपासात १ संशयीत आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**भुसावळ शहरातील (जि.जळगांव) संत गाडगेबाबा नगरपालिका रुग्णालयात अनागोंदी कारभाराबाबत**

**(२५) १९९७८ (११-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील (जि. जळगांव) संत गाडगेबाबा नगरपालिका रुग्णालयात मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरु असून रुग्णांना कोणत्याही प्रकारे सुविधा मिळत नसल्याने रुग्णांना प्रचंड हाल सहन करावे लागत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातच उन्हाळ्यात उष्माघाताचे रुग्ण उपचारासाठी आल्यास त्याचेसाठी उघडण्यात आलेल्या उष्माघात केंद्रामध्ये कोणत्याही सुविधा नसल्याने हा कक्ष आयसीयूत गेल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरणगाव (जि.जळगांव) येथील परिहार चौकातील एका १३ वर्षीय मुलाचे अपहरण केल्याबाबत**

**(२६) २००१३ (१२-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धरणगाव (जि.जळगांव) येथील परिहार चौकातील एका १३ वर्षीय मुलाचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान काही अज्ञात व्यक्तींनी अपहरण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मलकापूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी केली करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय. तथापि याबाबत पोलीस स्टेशन मध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार अगर गुन्हा दाखल नाही.
(२) नाही.
(३) प्रकरणी चौकशी केली असता प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे १५ वर्षाच्या मुलाचे अपहरण करुन त्याला बेशुध्द केल्याचे व शुध्दीवर आल्यानंतर सदर मुलगा मलकापुर रेल्वे स्टेशन ट्रेनमध्ये असल्याचे त्या मुलाला आढळून आले. त्यानंतर मुलाने त्याचे भावास फोन करुन हकीकत सांगितली. घरच्यांनी सदर मुलास त्यांचे घरी घेवून आले तथापि, याबाबत गुन्हा नोद नसल्याने काहीही कारवाई करण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील हरसुल मध्यवर्ती कारगृहातील वरिष्ठ तुरुंगाधिकारी कैद्यांना जिवे मारण्याची धमकी देवून अमानुष मारहाण करीत असल्याबाबत**

**(२७) २०४१३ (१२-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील हरसुल मध्यवर्ती कारागृहातील वरिष्ठ तुरुंगाधिकारी तुरुंगातील कैद्यांना जिवे मारण्याची धमकी देवून अमानुषपणे मारहाण करीत असल्याबाबत कैदी कैलास बनसोडे यांनी राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करुन दिनांक १९ फेब्रुवारी ते ४ मार्च, २०१५ दरम्यान उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे. परंतु कैद्यांना जिवे मारण्याची धमकी अथवा मारहाण केलेली नाही.

(२) बंद्याने मा.मुख्य न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अधिक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहे यांनी चौकशी करुन त्यांच्या अहवालामध्ये बंद्यांने केलेला अर्ज कारागृह प्रशासनास वेठीस धरण्याच्या उद्देशाने सुडबुध्दीने नाहक बदनाम करण्याच्या दृष्टीने केलेला आहे, असे नमूद केले आहे. तसेच सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती करण्यात आली. त्या अनुषंगाने मा.न्यायालयाने देखील बंद्याने केलेल्या तक्रारी मोघम स्वरुपाच्या असून पुढील चौकशी करण्यासाठी आदेश पारीत करणेजोगी नाही. सबब सदर तक्रार दप्तरी दाखल केली असल्याचे मा. न्यायालयाचे दिनांक २६ मार्च, २०१५ च्या आदेशान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोतवाली (जिल्हा अहमदनगर) येथील पोलिसांनी संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्या तरुणाचा मृत्यु झाल्याबाबत

**(२८) २०७७८ (१०-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोतवाली (जिल्हा अहमदनगर) येथील पोलिसांनी संशयित म्हणून ताब्यात घेतलेला दलित तरुण नितीन बाळू साठे याचा दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास वैद्यकिय उपचारादरम्यान संशयास्पद मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) मयत तरुणाचा मृत्यु पोलीसांनी केलेल्या मारहाणीमुळे झाला असल्याचे निष्पन्न झाल्याने १ पोलीस निरिक्षक, १ पोलीस उपनिरिक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यासह इतर ४ पोलीस कर्मचारी असे एकूण ६ जाणाविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन अहमदनगर येथे गु.र.नं. १८७/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२, ३३०, ३३१, ३४८, १९३, २०३, ३४ व अ.जा.ज.अ.प्र.का.सन १९८९ चे कलम ३ (२) (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग अहमदनगर पथकामार्फत सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**पुणे शहर व जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या पाहता पोलीस ठाण्याची संख्या वाढवण्याबाबत**

**(२९) २१९४५ (१२-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या पाहता अस्तित्वात असलेले पोलीस मनुष्य बळ व पोलीस ठाण्याची संख्या कमी असल्याने ती वाढवण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक पोलीस ठाण्याची संख्या वाढवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये नवीन ६ पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्याता आली असून हद्दनिश्चितीबाबतची अधिसूचना दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्गमीत करण्यात आली आहे. सदर ६ पोलीस ठाणी व पोलीस आयुक्तालयातील इतर शाखासाठी विविध संवर्गात एकुण १५२३ पदे निर्माण करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३०) २२७१५ (१०-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांतील अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२)

- महासंचालक व सहसंचालक ही पदे रिक्त नाहीत.
- संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सहसंचालक यांचेकडे सोपविण्यात आला आहे.
- उपसंचालक संवर्गातील ६ रिक्त पदांपैकी ४ पदे पदोन्नतीने भरण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

- उपसंचालक व सहायक संचालक (मानसशास्त्र) तसेच उपसंचालक व सहायक संचालक (सायबर टेप व स्पिकर) या ४ रिक्त पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहेत.
- सहायक संचालकांची सद्य:स्थितीतील ११ रिक्त पदे तसेच संभाव्य रिक्त पदांपैकी ८ पदे पदोन्नतीने व ५ पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
- सहायक रासायनिक विश्लेषकांच्या एकूण ५० नामनिर्देशनाने भरण्याच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१६.७.२०१५ च्या शासन निर्णयात नमूद समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
- याव्यतिरिक्त गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संचालक यांचेस्तरावर चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणीतील अग्निशामक विभागामध्ये कुशल कर्मचा-यांची**
**तसेच अग्निशमन वाहनांची कमतरता असल्याबाबत**

**(३१) २२८७७ (११-०८-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणीतील अग्निशामक विभागामध्ये कुशल कर्मचा-यांचा वानवा तसेच अग्निशमन वाहनांची कमतरता अशा अनेक गैरसोयी असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी शहरासह तालुक्यातील लोकसंख्या व आकार मोठा असून शहराची लोकसंख्या तीन लाखांवर असून तालुक्याची पाच लाख ३७ हजार असतांना केवळ सहा कर्मचाऱ्यांवर तालुक्याचा भार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) परभणी शहर महानगरपालिका दिनांक ०१/११/२०११ पासून अस्तित्वात आली असून सन २०१२ मध्ये आकृतीबंध आराखडा मंजुर झालेला असून त्यामध्ये खालील प्रमाणे पदे मंजूर झालेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) अग्निशमन अधिकारी | - | ०३ |
| २) उप अग्निशमन अधिकारी | - | ०३ |
| ३) लिडींग फायरमन | - | ०९ |
| ४) वाहन चालक | - | १८ |
| ५) फायरमन | - | ६३ |

सद्यस्थितीत परभणी शहर महानगरपालिका परभणी येथे कायम कर्मचारी फायरमन ०३, मानधनावरील कुशल फायरमन ०४, वाहनचालक कायम ०१, रोजंदारी ०१, टेलिफोन ऑपरेटर ०२, लिपिक ०१, असे कर्मचारी आहेत, एकूण १२ कर्मचाऱ्यांवर अग्निशमनाचा भार आहे. सदरचे मनुष्यबळ वाढविण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तासगांव (जि.सांगली) येथील पोलिस कोठडीत असलेले दरोडेखोर पोलिस कोठडीचे छत फोडून पळून गेल्याबाबत**

**(३२) २३१४५ (१०-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि.सांगली) येथील पोलिस कोठडीत असलेले ३ दरोडेखोर पोलिस कोठडीचे छत फोडून पळून गेल्याची घटना दि.३१/५/२०१५ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, पोलीस कस्टडी रिमांड मधील ३ आरोपी दि.०१/०६/२०१५ रोजी छत तोडून पळून गेलेबाबत तसागाव पोलीस ठाणे भाग ६ गु.र.नं. ११३/२०१५ भा.दं.वि. कलम २२४, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन परागंदा आरोपींचा कसोशीने शोध घेवून यातील एका आरोपीस दि.५/६/२०१५ रोजी व इतर २ आरोपीस दि.६/६/२०१५ रोजी अटक केली आहे. स्था.मु.अ.शाखेने परागंदा आरोपीपैकी पहाऱ्यावरील पोलीस शिपाई व लॉकअप गार्डचे अंमलदार यांना हलगर्जी व दुर्लक्षपणा केल्यामुळे निलंबित केले असून त्यांची खत्याअंतर्गत चौकशी सुरु आहे. सदर घटनेचा तपास पुर्ण झाला असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातील कैद्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याबाबत**

**(३३) २३१५३ (१२-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातील कैद्याने दि.६/४/२०१५ रोजी वा त्यासुमारास गळफास घेवून आत्महत्या केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) दिंडोरी पोलीस स्टेशन जिल्हा नाशिक यांनी गु.रं.क्र-१८७/१४-भा.द.वि.कलम, ३७६ ५०६ अ.जा. ज.प्र.का कलम ३(१), (१२), ३(२) (५) लैगिंक अत्याचार बाल संरक्षण अधिनयिम २०१२ मध्ये सदर बंदयास अटक करुन मा. जिल्हा सत्र न्यायालय व अति.सत्र न्यायालय नाशिक यांच्या आदेशान्वये दिनांक २९ डिसेंबर, २०१४ पासून कारागृहत दाखल करण्यात आले होते. कारागृहातील इतर न्यायाधीन बंद्यासोबत सदर बंदयास ठेवण्यात आले होते. बंदी क्र. ७०६ प्रल्हाद भगवंत रोकडे, याने पाण्याच्या टाकीतून शौचालयाला जाण्यासाठी पाण्याचा डबा भरला व शौचालयात गेला काही वेळाने बंदी क्र. ६४७ अरुण अशाराम वाघेरे हा लघुशंकेसाठी शौचालयात गेला असता उक्त बंदयाने खिडकिच्या गजाला बांधुन शौचालयास असलेल्या भिंतीच्या आडोशाला स्वत:हून गळफास घेवून आत्महत्या करुन घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी जाबजबाब घेतले असता त्यामध्ये बंदयाने नैराश्यातून व वैफलग्रस्त मानसिकतेतून आत्महत्या केल्याचे पोलीस चौकशी अंती निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी नाशिकरोड पोलीस स्टेशन येथे मृत्युबाबत नोंद घेवून तपास व कार्यवही करण्यात आली. सदर बंदयाचे शव श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, धुळे येथे शवविच्छेदन व्हिडीओ शुटिंगसह करण्यात आले असून सविस्तर अहवाल मा.राष्ट्रीय मानवी हक्क आयोग नवी दिल्ली येथे पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील विमानतळ विस्तारीकरण करुन विमान सेवा सुरु करण्याबाबत**

**(३४) २३२४५ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील विमानतळ विस्तारीकरण करुन विमान सेवा सुरु करण्याची मागणी विविध संघटना, उद्योजक यांनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाची जमीन विमानतळ प्राधिकरणाला देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मंत्री, वने यांना पत्र लिहुन विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विमानतळ लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) दिनांक २६ जून, २०१५ रोजी मा.मंत्री, नागरी उड्डाण, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणाचा पाठपुरावा करण्यात आला असून सदर बैठकीत भारतीय विमानतळ प्राधिकरणाने कोल्हापूर विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम लवकरात लवकर हाती घेण्याचे मान्य केले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेने विविध खात्यामध्ये विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्त केल्याबाबत**

**(३५) २३५१२ (१०-०८-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने विविध खात्यामध्ये विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या ४० सेवानिवृत्त अधिका-यांवर गेल्या पाच वर्षात १ कोटी ७० लाख रुपये खर्च केल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांची नियुक्ती करतांना शासनाची परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन आयुक्तांनी परस्पर काही अधिकाऱ्यांना तीन वेळा मुदतवाढ दिल्यांचेही उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून परस्पर नियुक्ती करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असल्याने राज्य शासनाच्या दिनांक १४.०१.२०१० च्या शासन निर्णयाच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १९.०६.२०१० रोजी परिपत्रक प्रसारीत करुन, महापालिकेच्या विविध खात्यांमध्ये, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने "विशेष कार्य अधिकारी" या पदावरील नेमणुका करण्यात आल्या होत्या.

दिनांक २७.०५.२०१५ रोजी कार्यरत असलेल्या "विशेष कार्यकारी अधिकारी" यांच्या सेवा महापालिकेच्या दिनांक २७.०५.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये दिनांक ०१.०६.२०१५ पासून संपुष्टात आणण्यात आल्या आहेत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना विशेष कार्य अधिकारी म्हणून नेमणुक करतांना, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने काही विशेष कार्य अधिकाऱ्यांना सोपविण्यात आलेल्या विवक्षित कामाच्या पूर्ततेकरिता मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे बनावट कागदपत्राच्या आधारे विमा पॉलीसी कंपन्यांना ठकविणाऱ्या रॅकेटला पोलीसांनी पकडल्याबाबत**

**(३६) २३७५१ (१२-१०-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे मृत व्यक्तीला कागदोपत्री जिवंत दाखवून त्याच्या नावे लाखो रुपये किमतीची विमा पॉलीसी खरेदी करुन कालांतराने मयत व्यक्तीलाच पुन्हा मृत घोषीत करुन

बनावट कागदपत्राच्या आधारे विमा पॉलीसी कंपन्यांना ठकविणाऱ्या रॅकेटला पोलीसांनी दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी फसवणूकीचा प्रयत्न करणाऱ्या सहाजणांविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तपास करण्यात आला आहे काय, असल्यास तपासात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली करण्यात येत आहे आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) व (२) प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन २१ आरोपीविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.रु.नं. १०७/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४७१, ५११, ३४ प्रमाणे दिनांक ३ जून, २०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.
(३) रिलाईन्स लाईफ इन्शुरंन्स कंपनी मार्फत विमा पॉलीस कागदपत्रांची तपासणी/ पडताळणी करणे करीता प्राप्त झालेल्या कागद पत्रामध्ये संबंधित वारसांनी/इसमांनी व डॉक्टरांनी एकमेकाशी संगणमत करुन पॉलीसी धारक हे पॉलीसी खरेदी करण्यात आगोदरच म्हणजे माहे जुन २०१३ ते सन २०१४ मध्ये मयत झाले असताना मयत व्यक्ती जिवंत आहेत असे भासवून त्यांचे नांवे पॉलीसी उतरविली व त्यानंतर ते मयत झाले आहेत असे खोट/बनावट मृत्यु प्रमाणपत्र सादर करुन रिलायन्स लाईफ इन्शुरन्स कंपनीमधुन ३०,८५,०००/- (तीस लाख पंच्याएंशी हजार) रुपये जीवन विमा पॉलीस खरेदी करुन रिलायन्स लाईफ इन्शुरन्स कंपनीची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न केला, गुन्ह्यांतील सर्व २१ निष्पन्न आरोपीना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी ६ आरोपींना अटकपुर्व जामीन मंजूर झाला आहे. सद्य:स्थितीत सर्व आरोपी जामीनावर असून गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## सिंहस्थ कुंभमेळयासाठी जगभरातून येणारे लाखो भाविक यांच्या सुरक्षिततेबाबत

**(३७) २३७५९ (१०-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वसामान्य नाशिककर आणि आगामी सिंहस्थ कुंभमेळयासाठी जगभरातून येणारे लाखो भाविक यांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील गुन्हेगारीला आळा घाला, गुन्हेगारांवर वचक निर्माण करुन जनतेला सुरक्षिततेची हमी द्या, अशी मागणी पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडे दिनांक २२ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार पोलीस प्रशासनाकडून कोणत्या विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) या मागणीच्या अनुषंगाने कुंभमेळ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी या दृष्टीकोनातून पूर्वतयारी म्हणून मोहल्ला कमिटी, शांतता समिती, पुरोहित संघ, साधुमहंत, ऑटोरिक्षा युनियन, विविध वाहतूक संघटना, सामाजिक संघटना, विविध भाषिक गटांचे प्रतिनिधी इत्यादी सोबत बैठका घेण्यात आल्या आहेत. एकूण ८१ शांतता समितीच्या बैठका, मोहल्ला कमिटीच्या एकूण ४३५ बैठका व इतर १०१२ बैठका अशा एकूण १५२८ बैठका घेण्यात आल्या आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान होणाऱ्या शाही पर्वणी काळासाठी शहरात येणाऱ्या विविध मार्गांना अनुसरुन सात सेक्टरमध्ये विभाजन करण्यात आले असून वाहतुकीची व सुरक्षेची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत बंदोबस्त नियोजन करताना शाही पर्वणी कालवधीचा बंदोबस्त व शाहीपर्वणी व्यतिरिक्त दिवसांचा बंदोबस्त अशा दोन विभागात नियोजन करण्यात आले आहे. एकूण बंदोबस्तामध्ये साधुमहंतांसाठीचा शाही मिरवणूक बंदोबस्त व साधुग्राम बंदोबस्त, भाविकांच्या मार्गासाठीचा बंदोबस्त, शहरासाठीचा कायदा व सुव्यवस्थेचा बंदोबस्त, शहरासाठीचा वाहतूक बंदोबस्त इत्यादीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पब्लिक ॲड्रेस सिस्टिम्स् बसविण्यात आल्या आहेत. सुरक्षेसाठी शहरात १७४ ठिकाणी एकूण ३४८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वाहनतळ व स्नानघाट परिसरात २४ निरीक्षण मनोरे उभारण्यात येत असून त्याद्वारे गर्दीतील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. भाविकांच्या मार्गावर तसेच वाहनतळ, घाट परिसर या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६९ पोलीस चौक्या उभारण्यात येणार आहेत. घातपातासारखे प्रकार घडू नये याकरिता ११ बॉम्ब शोधक व नाशक पथके ठेवण्यात येणार असून अधिक सुरक्षेसाठी फोर्स-वन पथक, जलद प्रतिसाद पथक ठेवण्यात येणार असून त्यांचेकडून वेळोवेळी सराव, प्रात्यक्षिके घेण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात विविध गुन्ह्यातील आतापर्यंत १,३१८ आरोपी पोलिसांच्या हातातून निसटून गेल्याबाबत**

**(३८) २३७६२ (१२-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात विविध गुन्ह्यातील आतापर्यंत १३१८ आरोपी पोलिसांच्या हातातून निसटून गेले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील किती आरोपींना पुन्हा पकडण्यात आले आहेत उर्वरित फरार आरोपींना पकडण्याकरिता शासनाने कोणते विशेष प्रयत्न केले आहेत,
(३) तसेच सदरचे आरोपी हातातून निसटून गेल्याप्रकरणी किती अधिका-यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही, तथापि नाशिक शहर पोलीस हद्दीत दाखल गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या आरोपीपैकी शोध घेवूनही मिळून न आलेले आरोपीविरुध्द फौ.प्र.सं.कलम २९९ अन्वये एकूण १३१८ पाहिजे असलेल्या आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

(२) पाहिजे असलेल्या १३१८ आरोपीविरुध्द मार्च २०१५ ते जुलै, २०१५ पर्यंत १७ आरोपींना शोध घेवून अटक करुन न्यायालयात हजर केले आहेत. उर्वरित आरोपींना शोध घेण्यासाठी सर्व पोलीस स्टेशन स्तरावर शोध घेण्यात येत आहे.

(३) पाहिजे असलेले १३१८ आरोपी हे पोलीसांच्या हातून निसटून गेलेले नाहीत त्यामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील मुरगूड पोलीस ठाण्यात पोलीस बळ कमी असल्याबाबत**

**(३९) २३९२७ (१२-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि. कोल्हापूर) तालुक्यातील मुरगूड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ५७ गावांचा समावेश असून प्रत्येक वर्षी गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढत होताना दिसत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, गुन्ह्यांचे प्रमाण व्यापक कार्यक्षेत्राचा विचार करता पोलीस अधिका-यांसह ५१ पोलीस कर्मचारी एवढे पोलीसबळ असून रोज २० ते २५ कर्मचारी कामावर हजर असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) कागल तालुक्यातील मुरगूड पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात एकुण ५८ गावांसह वाड्यावस्त्यांचा समावेश आहे. सदर कार्यक्षेत्रात सन २०१३ मध्ये २३७ गुन्हे, सन २०१४ मध्ये १९६ व सन २०१५, ऑगस्ट पर्यंत १०० गुन्हे दाखल झालेले आहे. सबब गुन्ह्यांच्या प्रमाणात घट झालेली आहे.

(२) व (३) मुरगूड पोलीस स्टेशन येथे २ पोलीस अधिकारी व ४३ पोलीस कर्मचारी मंजुर संख्याबळ असून सद्य:स्थितीत ३ पोलीस अधिकारी व ४२ पोलीस कर्मचारी कर्तव्यावर हजर आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## कोल्हापूर शहरात चेन स्कॅचर्सची दहशत पसरल्याबाबत

**(४०) २४४१३ (१२-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरासह जिल्हयात चेन स्कॅचर्सची दहशत पसरलेली असून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र व महिलांच्या अंगावरील दागिने हिसकावून 'धूम स्टाईल' ने दागिने पळविण्याच्या घटनेत लक्षणीय वाढ झाली असल्याचे माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिसामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) कोल्हापूर जिल्हयात माहे जून, २०१४ मध्ये सोनसाखळी चोरीचे १५ गुन्हे दाखल होते सन २०१५ जून अखेर सोनसाखळीचे ५ गुन्हे दाखल आहेत. सबब सन २०१४ च्या तुलनेत सोनसाखळी चोरीचे प्रमाण कमी झालेले आहे.

(२) सोनसाखळीच्या चोरीस आळा घालण्यासाठी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी बीट मार्शल, सेक्टर पेट्रोलिग, पायी गस्त, सशस्त्र मोटार सायकल पेट्रोलिंग, नाकाबंदी व कोबींग ऑपरेशन या योजना राबवून घरफोडी चोरीचे, मोटर सायकल चोरीचे गुन्हे शरिराविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी यश आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## नवी मुंबईतील ९५ गावठाणांच्या लगतची १ हजार ६५७ अनाधिकृत बांधकामे

**(४१) २५१९५ (११-०८-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ९५ गावठाणांच्या लगतची १ हजार ६५७ अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई करणार असल्याचे सिडकोने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती अनधिकृत बांधकाम पाडणार आहेत, त्याची सविस्तर माहिती काय,

(३) असल्यास, ही कारवाई केव्हा पर्यंत सुरु होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सिडकोने केलेल्या कारवाईत १८० अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली असून उर्वरित कारवाई सुरु आहे.

---

## जळगांव महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शिक्षकांचे गेल्या वर्षभरापासून वेतन अदा केले नसल्याबाबत

**(४२) २५२८२ (११-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या २१३ शिक्षकांचे गेल्या वर्षभरापासून महानगरपालिका प्रशासनाने वेतन अदा केले नसल्यामुळे त्यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत वेतन अदा न करण्याची कारणे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षकांना त्यांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) (३) व (४) तत्कालीन जळगांव नगरपालिकेने विविध विकास कामांसाठी हुडको व जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड महानरगपालिकेकडून विहित मुदतीत होऊ शकली नाही.

सदर कर्ज परतफेडीसंदर्भात याचिका क्र. १०३६६/२०१४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार हुडको या वित्तीय संस्थेस दरमहा तीन कोटी व याचिका क्र१७१७/२००३ मधील आदेशानुसार जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दरमहा एक कोटी इतकी रक्कम अदा करावी लागत आहे. तसेच विविध कारणामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील घट झाली आहे.

यास्तव, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांच्या पगारासाठीचा महानगरपालिका हिश्यांची रक्कम मे, २०१४ पासूनची देता आली नाही. मात्र शासन अनुदानाचा ५० टक्के हिस्सा वेतनाच्या रकमा नियमितपणे अदा करण्यात आल्या आहेत.

जळगांव महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत्र वाढवून आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता सर्वातोपरी प्रयत्नशील आहे. तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार शिक्षकांचे वेतन व सेवानिवृत्तीवेतन अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिकडून करण्यात येत आहे.

---

## अमरावती महानगरपालिकेने शहर स्वच्छतेकरीता ऑटोच्या किंमतीमध्ये तफावत असल्याबाबत

**(४३) २५४१७ (११-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेने शहर स्वच्छतेकरीता सन २०१५ मध्ये खरेदी केलेल्या ऑटोच्या किंमतीमध्ये व सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ऑटोच्या किंमतीमध्ये तफावत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऑटो खरेदी घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१५) :** (१) होय.
(२) होय. तशी चौकशी करण्याबाबतचे पत्र महापालिकेस प्राप्त झाले आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणात चौकशीअंती अपेक्षीत दर व खरेदी दर यात तफावत दिसून आल्याने, याबाबत पोलीस स्टेशन, सिटी कोतवाली येथे एक.आय.आर. दाखल करण्यात आलेल्या असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणात वेळीच कार्यवाही सुरु केलेली असल्याने, कोणत्याही विलंब झालेला नाही.

---

## शेटफळे (ता.आटपाडी, जि.सांगली) या ग.दि.माडगूळकर यांचे जन्मगांवीचे स्मारक गेली सहा वर्षे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४४) २५६५४ (१४-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेटफळे (ता.आटपाडी, जि.सांगली) या ग.दि.माडगूळकर यांचे जन्मगांवीचे स्मारक गेली सहा वर्षे निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारक पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) थोर साहित्यिक कै. ग.दि. माडगूळकर यांचे शेटफळे (ता. आटपाडी जि.सांगली) येथे स्मारक उभारण्याच्या रु. ३५.२३ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास दिनांक २४ ऑक्टोबर, २००३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सन २००५-०६ आणि सन २००६-०७ मध्ये अनुक्रमे रु. १०,५६,९००/- आणि रु. २४,६६,१००/- याप्रमाणे संपूर्ण निधी वितरित केला आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यता दिल्याप्रमाणे काम पूर्ण झालेले आहे.

त्यानंतर स्मारकाच्या इमारती भोवती बगीचा, कुंपण भिंती, ओढ्यालगत संरक्षक भिंत इत्यादी दुसऱ्या टप्प्यातील कामांचे रु.१४.९८ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक व आराखडे जिल्हाधिकारी यांनी सादर केले असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**बीड जिल्ह्यातील स्टेट ऑफ हैद्राबाद शाखेच्या लॉकर मधून**
**एका महिलेचे ५० तोळे सोने गहाळ झाल्याबाबत**

**(४५) २६००० (१२-०८-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील स्टेट ऑफ हैद्राबाद शाखेच्या लॉकर मधून एका महिलेचे ५० तोळे सोने गायब झाल्याचे दिनांक ६ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलेने लॉकरची चावी हरविल्याची लेखी तक्रार बँक व्यवस्थापक यांना दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महिलेचा लॉकर व्यवस्थापक यांनी उघडल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लॉकर कोणी उघडला याची नोंद असल्यामुळे संबंधित अधिकारी यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे व पुढील चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

प्रकरणी दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी पोलीस स्टेशन आष्टी, जि.बीड येथे गु.र.नं. ५६/१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) गुन्ह्याच्या तपासात दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी कामकाजाच्या वेळेत स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा कडा येथे असलेले लॉकर नं. A-४२ हे आरोपी तात्कालीन बँक मॅनेजर, फिर्यादीचा पुतन्या यांनी संगनमत करुन फिर्यादीचे लॉकर परस्पर उघडून लॉकरमध्ये ठेवलेला ५० तोळे सोने व इतर कागदपत्र लॉकरमधून काढून अपहार, विश्वासघात व फसवणूक केल्याचे आढळून आले. प्रकरणी ३ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करुन त्यांना पोलीस व न्यायालयीन कोठडी घेवून तपास करण्यात आला. सद्य:स्थितीत आरोपी जामीनावर आहेत. गुन्ह्याचे तपासात लेजर बुक जप्त करण्यात आले आहे व इतर पुरावा हस्तगत करण्यात आला असून आरोपीचे सह्याचे नमुने हस्ताक्षर तज्ञाकडे तपासणीसाठी पाठविले आहेत. गुन्ह्याचा तपास चालु आहे.

---

**स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागायवर्गीय सहकारी संस्था (नियो), १३/४४२,**
**टिळक नगर चेंबूर, यांना सदनिका मिळण्याबाबत**

**(४६) २६१५४ (११-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागायवर्गीय सहकारी संस्था (नियो), १३/४४२, टिळक नगर चेंबूर, मुंबई-८९ ला ८४ सदनिका मिळणे बाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रितनिधी यांनी मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१९-१०-२०१५) :** (१) मा.मंत्री, गृहनिर्माण यांना दि.१७.३.२०१५ च्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

(२) महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ चे विनियम १३ (२) मधील तरतुदी तसेच स्वयंभु कोकण मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.१४८०/२०१५ मध्ये देण्यात आलेले आदेश विचारात घेऊन, स्वयंभू कोकण मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता विनियम १३(२) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्याची / सदनिका वितरीत करण्याची विनंती मागणी मान्य करता येणार नाही असे दि.१०.८.२०१५ च्या पत्रान्वये मुख्य प्रवर्तक, स्वयंभू कोकण मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरगा शहर व तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) अवैध प्रकार बंद करण्याबाबत**

**(४७) २६१५९ (१२-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा शहर व तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) गावागावाहून गावठी दारु, मटका, चंदनाचोरी, शिंदी, अवैध प्रवासी वाहतूक तात्काळ बंद करणे बाबत परिसरातील विविध सामाजिक संघटना, कार्यकर्त्यांव्दारे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास तहसीलदार, उमरगा यांना लेखी निवेदनाव्दारे विनंती करण्यात आली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही न झाल्याने विविध संघटना, कार्यकर्त्यांव्दारे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास तहसिल कार्यालय, उमरगा येथे धडक मोर्चा काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यवाहीस विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

उमरगा शहर व तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्याबाबत दि. १२/०१/२०१५ रोजी तालुक्याध्यक्ष लहुजी शक्ती सेना, उमरगा यांनी तहसिलदार उमरगा यांना निवेदन दिले आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दि. २४/०१/२०१५ रोजी मोर्चा काढण्यात आला होता. तथापि सन २०१५ मध्ये अवैध दारु बंदीच्या ७८ गुन्ह्यात ७९ आरोपींना अटक करुन रु.१०१९४८/- चा मुद्देमाल जप्त केला, अवैध जुगाराचे ६६ गुन्ह्यात १८२ आरोपींना अटक करुन रु.४,७९,५७५/- चा मुद्देमाल जप्त केला तसेच अवैध प्रवाशी वाहतुकीच्या ३० गुन्ह्यात रु.२९०००/- दंड वसूल करण्यात आला व इतर मोटार वाहन कायद्याच्या गुन्ह्यात ७६८ गुन्ह्यात रु.१,१०,८००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) वेळीच कार्यवाही करण्यात आली आहे विलंब झालेला नाही.

---

## रायगड जिल्हयातील उरण बंदरात दहा वर्षापूर्वी जप्त केलेली जिवंत स्फोटके कळंबोली येथील गोदामात पडून असल्याबाबत

**(४८) २६२३६ (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील उरण बंदरात दहा वर्षापूर्वी जप्त करण्यात आलेली जिवंत स्फोटके कळंबोली येथील एका गोदामात पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही स्फोटके नष्ट करण्यासठी नवी मुंबई पोलीसांनी संबंधित विभागाकडे सुमारे २०० पत्र पाठवूनही दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्फोटकांच्या सुरक्षेसाठी आतापर्यंत शासनाचा लाखो रुपयांचा खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्फोटकांची विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) दाखल गुन्ह्यातील जप्त स्फोटकांच्यासाठी नष्ट करण्याकरिता, कळंबोली पोलीस ठाणे, सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, पोलीस आयुक्त, परि-२ पनवेल व पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यालयांकडून दि जॉईंट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोजीव, नवी मुंबई व दि सेक्रेटरी, ऑर्डेनन्स फॅक्टरी बोर्ड, कोलकत्ता, एक्सप्लोजीव फॅक्टरी, खडकी, पुणे, भंडारा, व शासनास पत्र व्यवहार करण्यात आलेला असून शासनाकडून केंद्रशासनास पत्र व्यवहार करण्यात आला आहे. मा.जिल्हा व सत्र न्यायालय अलिबाग रायगड न्यायालयाचे आदेशान्वये स्फोटकसाठा नष्ट करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) गुन्ह्यातील साठ्याचे सुरक्षेसाठी पोलीस मुख्यालय नवी मुंबई येथून दिवसा व रात्री पोलीस सरंक्षण पुरवण्यात येत आहे.
(४) शासन स्तरावरुन केंद्र शासनास तसेच नवी मुंबई, पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयांकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचे अनुषंगाने चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोझिव्हस, नागपूर यांनी मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रि, डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल पॉलीसी अँड प्रमोशन (DIPP) या मंत्रालयांना पत्रव्यवहार केलेला आहे.

केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाकडून सदर स्फोटकांच्या विल्हेवाटीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिन्नर (नाशिक) येथील नाशिक पुणे, नाशिक-शिर्डी रस्त्यांवरील अपघाताचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४९) २६७५८ (१२-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) येथील नाशिक पुणे, नाशिक-शिर्डी रस्त्यांवरील अपघातांचे तसेच अपघातामध्ये मृत पावलेल्यांच्या आकडेवारीमध्ये गत ५ वर्षामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावर शासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) सिन्नर परिसरातील नाशिक पुणे महामार्ग व नाशिक शिर्डी मार्गावर सन २०११ ते २०१३ मध्ये अपघातामध्ये व अपघातातील मृतांच्या संख्येमध्ये घट झाली आहे. सन २०१४ ते जुलै २०१५ पर्यंत अपघातात व मृतांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सिन्नर मधील नाशिक-पुणे मार्ग तसेच नाशिक-शिर्डी मार्गावरील अपघात रोखण्याकरिता पोलीस विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत,
१. नाशिक-पुणे मार्ग चारपदरी करण्याचे काम सुरु आहे.
२. नाशिक-शिर्डी मार्ग दुपदरी करण्यात आला आहे.
३. नाशिक -पुणे तसेच नाशिक शिर्डी मार्गावर अपघातप्रवण स्थळांचे सर्वेक्षण करुन अशा ठिकाणी स्पीड ब्रेकर, सुचना फलक लावणे, कॅटआय, पांढरे पट्टे, रॅम्बलर्स लावणे इत्यादी सुरक्षा उपाय योजण्यात येत आहेत तसेच ठिकठिकाणी रेडीयम पट्टया लावणे, वेगमर्यादा फलक लावण्यात आले आहेत.
४. नाशिक-पुणे तसेच नाशिक शिर्डी मार्गावर सिन्नर, बाभळेश्वर, डोळासणे व आळेफाटा या ठिकाणी महामार्ग पोलीसांची मदत केंद्रे असून, पोलीस अधिकारी/कर्मचारी वाहतूकीचे नियमन करीत असतात.

५ अवैध प्रवाशी वाहतुकीवर तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर स्थानिक वाहतूक शाखा व महामार्ग पोलीसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परीक्षा शुल्कात वाढ केल्याबाबत**

**(५०) २८१७४ (१५-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परीक्षा शुल्कात दिनांक १४ व २५ मे, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे साधारण ५०० ते ७०० रुपयांची शुल्क वाढ दर्शवून ती रक्कम PLA मध्ये जमा करुन परीक्षेच्या अनुषंगाने होणारा खर्च त्यामधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्यांना विविध कामासाठी लागणाऱ्या कुशल मनुष बळाचा पुरवठा करणे, युवकांना कौशल्ययुक्त प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार करण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये ४१७ शासकीय व ४५४ अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून त्याची प्रवेश क्षमता दरवर्षी साधारण १५०००० एवढी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रशिक्षण संस्थेत ग्रामीण भागातील गरजु विद्यार्थी येत असून,सदर परीक्षा शुल्कात वाढ करुन प्रशिक्षणार्थीवर एवढा मोठा आर्थिक भुर्दंड पाडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उस्मानाबादसारख्या दुष्काळी जिल्हयातील प्रशिक्षणार्थीसाठी या प्रशिक्षण शुल्कात सवलत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) परीक्षा शुल्क वाढीची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-
- यापूर्वीचे परीक्षा शुल्काचे दर जवळपास १२ वर्षापूर्वीचे होते,
- डीजीईटी, नवी दिल्ली यांनी जानेवारी, २०१५ च्या परीक्षेपासून रुपये ७५/- प्रति प्रशिक्षणार्थी व प्रति सत्र परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत,
- शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत यापूर्वी वर्षातून एकदाच परीक्षा घेण्यात येत होती, तथापि, जानेवारी, २०१४ पासून सत्र परीक्षा पध्दतीनुसार दर सहा महिन्यांची परीक्षा घ्यावी लागते, त्यामुळे कच्च्या मालावरील खर्चात वाढ झाली आहे,
- परीक्षा अनुषंगिक कमाकरीता करावा लागणारा मानधनावरील खर्च, उत्तरपत्रिका व जॉब तपासणीवरील खर्च, स्टेशनरी वरील खर्च इ. बाबीमुळे देखिल परीक्षा शुल्कात वाढ झालेली आहे,

(४) व (५) महसूल व वन विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-२०१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपैकी कमी आलेल्या १४७०८ गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करुन विविध सवलती देण्यात आल्या आहेत, त्यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची बाब समाविष्ट आहे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण शुल्क माफ करण्यासंदर्भात अद्याप कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.